# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ (आठ) पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक सन २०२६ चे कार्यक्रमाबाबत.**

**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम -२०२६**
**निवडणूक कार्यक्रमाबाबत प्रसिद्धी सूचना**

ज्या अर्थी पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत नियम १४ (२) अंतर्गत ०८ शहर पथविक्रेता समिती सदस्यांसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समितीची निवडणूक प्रक्रिया पार पाडणे आवश्यक आहे.

त्या अर्थी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील पथविक्रेत्यांना कळविण्यात येत आहे की महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ (आठ) प्रवर्गातील पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने घेणेकरिता खालील प्रमाणे निवडणूक कार्यक्रम प्रसिद्ध करण्यात येत आहे. सदर निवडणूक खालील दर्शविलेल्या पथविक्रेत्यांच्या सदस्यांच्या ०८ (आठ) प्रवर्गासाठी घेण्यात येईल.

| अ.क्र. | प्रवर्ग | पदसंख्या | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (सर्वसाधारण) | १ | महाराष्ट्र पथविक्रेता ( उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री व विनियमन) अधिनियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत ०८ (आठ) जागांसाठी |
| २ | अनुसूचित जमाती (महिला राखीव) | १ | |
| ३ | इतर मागासवर्ग (महिला राखीव) | १ | |
| ४ | अल्पसंख्यांक (सर्वसाधारण) | १ | |
| ५ | दिव्यांग व्यक्ती (सर्वसाधारण) | १ | |
| ६ | खुला प्रवर्ग (महिला राखीव) | १ | |
| ७ | खुला प्रवर्ग (सर्वसाधारण) | २ | |
| | एकूण | ८ | |

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका पथविक्रेता समिती सदस्य निवडणूक कार्यक्रम -२०२६

| अ.क्र. | विवरण | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | नामनिर्देशन पत्र वाटप करणे | दि.०१/०७/२०२६ बुधवार<br>दि.०४/०७/२०२६ शनिवार | सकाळी ११.००<br>ते दुपारी ४.०० | प्रकल्प विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालय |
| २ | नामनिर्देशन पत्र स्वीकारणे | दि.०६/०७/२०२६ सोमवार<br>ते दि.११/०७/२०२६ शनिवार | सकाळी ११.००<br>ते दुपारी ४.०० | |
| ३ | प्राप्त नामनिर्देशन पत्राची छाननी करणे | दि.१३/०७/२०२६ सोमवार | सकाळी ११.००<br>ते छाननीपर्यंत | |
| ४ | नामनिर्देशन प्राप्त अर्जाची छाननी अंती अंतिम वैध्य उमेदवाराची प्रारूप यादी प्रसिद्ध करणे. | दि.१३/०७/२०२६ सोमवार | छाननी नंतर | |
| ५ | आक्षेप अर्ज स्वीकारणे | दि.१४/०७/२०२६ मंगळवार<br>दि.१५/०७/२०२६ बुधवार | सकाळी ११.००<br>ते दुपारी ३.०० | |
| ६ | नामनिर्देशन प्राप्त अर्जाची छाननी अंती अंतिम वैध्य उमेदवाराची प्रारूप यादी प्रसिद्ध करणे. | दि.१६/०७/२०२६ गुरुवार | दुपारी ३.०० नंतर | |
| ७ | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | दि. १७/०७/२०२६ शुक्रवार | सायंकाळी ५.००<br>पर्यंत | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | नामनिर्देशन पत्र माघारी नंतरची अंतिम यादी प्रसिद्ध करणे | दि. १७/०७/२०२६ शुक्रवार | सायंकाळी ५.०० नंतर | |
| ९ | मतदान दिनांक | दि.२५/०७/२०२६ शनिवार | सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.०० पर्यंत | १ . मनपा शाळा, भडकल गेट,(प्रभाग क्र. १ व २ मधील पथविक्रेत्यांसाठी )<br>२.मनपा शाळा, किराडपुरा , (प्रभाग क्र .३ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>३. मनपा शाळा, एन-७ ,सिडको , (प्रभाग क्र .४ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>४. मनपा शाळा , मुकुंदवाडी (प्रभाग क्र .५ व ६ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>५.प्रियदर्शनी मनपा शाळा, शहानुरमिया दर्गा , (प्रभाग क्र .७ व ८ मधील पथविक्रेत्यांसाठी)<br>६. मनपा शाळा , सिल्कमिल कॉलोनी , ( प्रभाग क्र.९ व १० मधील पथविक्रेत्यांसाठी) |
| १० | मत मोजणी | दि.२६/०७/२०२६ रविवार | सकाळी ११.०० पासून | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका मुख्यालय |
| ११ | निवडणूक निकाल जाहीर करणे | दि.२६/०७/२०२६ रविवार | मतमोजणी नंतर | |

(दिनांक ०४ जुलै २०२६ शनिवार व दिनांक ११ जुलै २०२६ शनिवार रोजी निर्धारित वेळेत नामनिर्देशन पत्र स्विकारले जातील) या बाबतच्या सूचना छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या https://chhsambhajinagarmc.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

तरी पथविक्रेत्यांच्या सर्व नोंदणीकृत सदस्यांनी उपरोक्त निवडणूक कार्यक्रमाची कृपया नोंद घ्यावी व निवडणूक कार्यक्रम पार पाडण्यास सहकार्य करावे.

Digitally signed by
Amol Jagannath Yedage
Date: 27-06-2026
18:36:18

ठिकाण :- छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका.
दिनांक :- /०६/२०२६

(अमोल येडगे )भा.प्र.से.
आयुक्त,
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

Digitally signed by
Aparna Mukesh Sedamkar
Date: 26-06-2026
20:11:16

# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

**महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर नगर पथविक्रेता समिती निवडणूक -2026**

**महाराष्ट्र राज्य नगर पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियम) नियम,2016**

## सुचना

1) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या शहर फेरीवाला समिती निवडणूक लढविण्याकरीता उमेदवाराची पात्रता खालीलप्रमाणे असेल.

- उमेदवाराचे नाव पथविक्रेत्यांच्या अंतिम मतदार यादीमध्ये असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या नावे अतिक्रमण विभाग, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका यांचेकडील थकबाकी नसावी.
- उमेदवाराच्या नावे छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेकडील मिळकत कर / पाणीपट्टी थकबाकी ना-हरकत दाखला असणे आवश्यक आहे.
- उमेदवार आरक्षित संवर्गातून निवडणूक लढवीत असल्यास त्याच्याकडे त्यासंवर्गातील जातीचा दाखला व जात पडताळणी, विकलांग / दिव्यांग दाखला, अल्पसंख्याक दाखला / प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
- उमेदवाराने नगरविकास विभाग यांचे पथविक्रेता असाधारण क्र. ११६, ३ ऑगस्ट २०१६ च्या राजपत्रातील अर्जासोबत नमूद घोषणापत्र दाखल करणे आवश्यक आहे.
- उमेदवाराच्या पात्रतेबाबत इतर कोणताही मुद्दा उपस्थित झाल्यास सार्वत्रिक निवडणूकमध्ये नमूद असलेले नियम लागू होतील, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ मधील मुद्दा क्र. १६ (२) मध्ये पथ विक्रेत्यास जर तो: (एक) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असणाऱ्या अपराधासाठी सिध्द दोषी असेल किंवा (दोन) नगर पथविक्रेता समितीचा सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडण्याकरीता शारिरिकदृष्ट्या किंवा मानसिकदृष्ट्या अक्षम असेल, तर नगर पथ विक्रेता समितीमध्ये निवडून येण्यास अपात्र ठरविण्यात येईल.

2. नामनिर्देशन पत्र शुल्क १००/- रुपये आकारणी करण्यात येईल. अंतिम मतदार यादी छत्रपती संभाजीनगर मनपाच्या प्रकल्प विभाग कार्यालयात उपलब्ध आहे.
3. नामनिर्देशन पत्र दाखल करताना त्यासोबत उमेदवारांना अनामत रक्कम रु.२०००/- जमा करावी लागेल व १/६ मतापेक्षा कमी मत मिळाल्यास अनामत रक्कम जप्त होईल.
4. पथ विकेता (उपजीविका संरक्षण व पथ विक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत नियम १६ (२) अंतर्गत उमेदवार अपात्र नसावा
5. अनुसूचित जाती अथवा अनुसूचित जमाती प्रवर्गाकरीता नामनिर्देशन पत्र सादर करताना त्यांच्या जाती, जमातीचे सक्षम अधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्राची सत्य प्रत नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे अनिवार्य राहील.
6. नामनिर्देशन पत्र स्वतः उमेदवार किंवा त्याचे सुचक व अनुमोदक यांनी व्यक्तीशः जमा करणे बंधनकारक आहे.
7. नामनिर्देशन पत्रावर मतदार यादीमध्ये ज्यांचे नाव समाविष्ट आहे अशा मतदारांपैकी एक सुचक व अनुमोदक यांचे नाव आणि त्यांची सही असणे अनिवार्य आहे.
8. मतदानाला येताना मतदारांनी आधारकार्ड सोबत आणावे लागेल अन्यथा मतदान प्रक्रियेत भाग घेता येणार नाही.
9. निवडणूक कार्यक्रमामध्ये तांत्रिक अडचणीमुळे फेरबदल करण्याचे अधिकार निवडणुक निर्णय अधिकारी यांचेकडे राहतील.
10. राज्य निवडणूक आयोगचे समक्रमांकाचे दि. १२ जुलै २००१ च्या पत्रान्वये लहान कुटुंबाचे प्रतिज्ञा पत्र देणे आवश्यक आहे.